# बीड जिल्हा कारागृहामध्ये गँगवॉर घडण्याअगोदर “आका, बोका, खोका” यांना आर्थर रोडसह इतर जिल्ह्यातील कारागृहात हलवा!


अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – १७६ ■ शनिवार दि.१५ मार्च २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 176 ■ Saturday Dt. 15 March 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4


# अजितदादा, जिल्ह्यात रक्तरंजित इतिहास घडवणाऱ्या ‘आका, बोका, खोकांना’ आर्थर रोडसह इतर कारागृहामध्ये हलवा



## ■ पालकमंत्री म्हणून अजितदादा तुम्हीच लक्ष घाला; गुन्हेगारांना शह देणाऱ्या आजी-माजी मंत्री आमदारांना धडा शिकवाच?

## ■ आका, बोका, खोकांना बीड जिल्हा कारागृहातून बाहेर निरोप पाठवायला सुविधा खुप सोपी आहे



बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या रक्तरंगीत इतिहासामध्ये आजपर्यंत बीड जिल्ह्याला कधीही शांततेत जीवन जगण्याची गरज राजकीय नेत्यांना वाटली नाही बीड जिल्ह्याच्या रक्तरंजित इतिहासामध्ये आता सुरेश धस धनंजय मुंडे यांच्या वादामध्ये वाल्मीक नावाचा आकार सुरेश धस यांच्या खोक्या ची एन्ट्री झाली आहे तर यावेळी मात्र आता दादा खिंडकर सारखा एका ग्रामीण भागातील खेड्यातील सरपंच राहिलेला व्यक्ती याचा आकार कोण आहे असा प्रश्न पडला आहे आता खोका आणि बोका यांच्यावरती मोका लागल्यानंतर यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर हलविण्यात यावं बीड जिल्हा कारागृहांमध्ये गँगवॉर होण्याची दाट शक्यता आहे एखाद्या चित्रपटात म्हणजेच अर्थात मुळशी पॅटर्न मध्ये ज्या पद्धतीने जिल्हा कारागृहामध्ये एक प्रकारे गैंग वर होतो आणि त्या ठिकाणी एक नवे अनेक आकार तयार होतात बीड जिल्ह्याच्या बाहेरील कारागृहामध्ये म्हणजेच आर्थर रोड सह इतरही बाहेर जिल्ह्यातील कारागृहामध्ये हलवा त्यांच्या सुख सुविधा कुठेतरी थांबल्या पाहिजे जेलमध्ये याच आखा भोका खोका यांना सुख सुविधा मिळत आहेत त्यामुळे बीडचे पालकमध्ये अजित पवार यांनी राजकीय नेत्यांच्या नांग्या ठेचण्यासाठी व बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी थांबविण्यासाठी याच आकाबोका आणि खोका यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर हलविण्याची गरज आज पडत आहे संतोष देशमुख हत्या प्रकरण नंतर बीड जिल्हा अशांततेत आहे कारण या बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून आता जनतेला शांततेची अपेक्षा आहे.

बीड जिल्हा कारागृहामध्ये गँगवार होण्याच्या अगोदर आका, बोका, खोका यांना जिल्हा बाहेरील इतर जिल्ह्यातील कारागृहात हलवा. कारण अजित दादा बीड जिल्ह्यामध्ये सध्या बीड जिल्हा कारागृहामध्ये वाल्मीक कराड गँग, बबन गीत्ते गँग, आठवले गँग आणि आता त्यात दादा खिंडकरची व सतीश भोसले उर्फ खोक्याची गँग, गुज्जर खान ची गँग असाही समावेश यामध्ये तू बडा क्या बडा राजकीय द्वेष तसेच वाल्मीक कराडला संपविल्याशिवाय दाढी काढणार नाही अशी शपथ बबन गीत्तेने घेतली आहे. तर बबन गीतेला संपविल्याशिवाय चप्पल घालणार नाही असा पवित्रा याठिकाणी वाल्मीक कराडांनी घेतले आहे. याची चर्चा सध्या बीड जिल्ह्यामध्ये जोरदार सुरू आहे. तर गुज्जर खान याची गँग ही मोठ्या दहशतीची गँग आहे. त्यामुळे बीड जिल्हा कारागरामध्ये ही गँग सक्रिय असतानाच आठवले गँग ही सक्रिय आहे. आठवले गँग ला वाल्मीक कराडकडून झालेला त्रास राजकीय देशात आठवले वर अन्याय झालेला आहे. तर या ठिकाणी दादासाहेब खिंडकर आणि सतीश भोसले खोक्या जे की स्वर्गीय देशमुख यांच्या भावाचा साडू असलेला दादा खिंडकर व आ.धस, आ. मुंडे यांच्या वादामध्ये पडलेला खोक्या यांच्यामध्ये आता नेमकी पुढील काळामध्ये जिल्हा कारागृहांमध्ये रवानगी होणार आहे. त्यामुळे बीड जिल्हा कारागृहामध्ये गँगवार होण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात कारागृहातील गँगवरचे आका, बोका आणि खोका यांना इतर जिल्ह्यामधील कारागृहात हलविणे गरजेचे आहे. तर अनेक आरोपींना सुख, सुविधा मदत जेलमध्ये राहून सुद्धा मिळत असल्यामुळे आता बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी यामध्ये लक्ष घालून राजकीय नेत्यांच्या व गुन्हेगारांच्या नांग्या ठेचण्यासाठी जिल्ह्यामध्ये हलविण्यात यावे व बीड जिल्ह्यामध्ये मुळशी पॅटर्न मधील चित्रपटासारखा परिस्थिती निर्माण होण्याअगोदर व बीड जिल्हा कारागृहांमध्ये एखाद्या गुन्हेगारांमध्ये एक व अनेक गटांमध्ये हाणामाऱ्या किंवा गँगवर होण्याच्या अगोदर त्यांना इतर जिल्ह्यामधील कारागृहात हलविणे गरजेचे आहे.







बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये संतोष देशमुख हत्या प्रकरणानंतर महाराष्ट्रामध्येच खळबळून आले आहे. गुन्हेगारी हत्याने बीड मागलेले असताना रक्तरंजित इतिहासामध्ये अनेक गुन्हेगार आता बीड जिल्हा कारागृहामध्ये आपण केलेल्या पापाचा पाढा वाचत बसले आहेत. यामध्ये प्रामुख्याने जर पाहिले तर राजकीय नेत्यांच्या दावणीला बांधलेले आका, बोका आणि खोका यांना पोसणारे नेते, अधिकारी यांना आता पालकमंत्री म्हणून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी लक्ष घालून यांच्या नांग्या ठेचल्या पाहिजेत तसेच बीड जिल्हा कारागृहांमध्ये गँग वर होण्याअगोदर त्यांना म्हणजेच आका, बोका, खोका यांना गुन्हेगारी पार्श्वभूमी पाहता बीड जिल्हा कारागृहामध्ये सुख सुविधांचा भरभराट आहे असे आरोप प्रत्यारोप विरोध होत असतानाच. मात्र बीडचे पालकमंत्री तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व मुख्यमंत्री तथागृहमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी लक्ष घालून बीड जिल्ह्याला नव्याने लाभलेले पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत नावाच्या दहशतखाली गुन्हेगार पळ काढत आहेत. अशा एसपींना आदेशित करून त्यांना मोकळीक देत बीड जिल्हा कारागृहातून अनेक गुंडांना महाराष्ट्रातील इतर जिल्ह्यांमध्ये म्हणजेच अथर रोड कारागृह नाशिक कारागृह, छत्रपती संभाजी नगर, येरवडा पुणे येथील कारागृह या ठिकाणी हलवून बीड जिल्हा कारागृहामध्ये गँग ओर होण्याअगोदर राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीडचे पालकमंत्री अजित पवार यांनी पुढाकार घेऊन यांना बीड जिल्ह्यात बाहेर पाठवावे, तसेच बीड जिल्ह्यातील रस्ते, रंगीत इतिहास बीड जिल्हा कारागृहामध्ये घडत असतानाच. मात्र काही निरोप बाहेर येत असल्याची ही चर्चा नागरिकांमध्ये ऐकायला मिळत आहे. कारण आतमध्ये बसलेले आका, बोका आणि खोका हे बाहेर येत असताना. इतर अर्थ कायद्यापाशी काही निरोप पाठवत आहेत का त्या ठिकाणावरून त्यांना निरोप येत असून बीड जिल्ह्यामध्ये दहशत निर्माण करण्यासाठी याचा उपयोग होत आहे. का त्यामुळे आका, बोका आणि खोका यांना बीड जिल्हा कारागृहाच्या बाहेर इतरत्र हलविण्यात यावे अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

“

वाल्मीक कराड यांना सुख सुविधा बीड जिल्हा कारागरामध्ये मिळत असल्याची या अगोदर विरोधकांनी टीका केलेली आहे त्यामुळे बीड जिल्ह्यातील आकाबोका खोका यांना बीड जिल्ह्याच्या बाहेर पाठवा आणि बीड जिल्हा कारागृहातील अधिकारी कर्मचारी यांना मोकळीक द्या त्यांच्यावरती राजकीय दबाव आणू नये म्हणून ही आदेशित कराव अशी अपेक्षा बीड जिल्ह्यातील जनतेला पालकमंत्री अजित पवार यांच्याकडून आहे तर बीड जिल्ह्याचे नवीन एसपी नवनीत कामत यांनाही गुन्हेगारांना झोपण्यासाठी फुल हॅन्ड परमिशन गृह विभागाने दिली पाहिजे कारण नवनीत कागद हे दहशत संपून यामध्ये सध्या तरी कार्यरत आहेत नवनीत कॉवत यांच्यामुळे बीड जिल्ह्यामध्ये गुन्हेगारांना आता चांगलाच झटका बसला आहे नवनीत कॉवत हे एक चांगले अधिकारी आहेत त्यामुळे बीडची जनता त्यांच्या कार्याचा कौतुक करत आहे.

# फेसबुक पोस्ट करून शिक्षकाची गळफास लावून आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

**बीडमध्ये गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या गुन्हेगारीची मालिका अजूनही थांबायचा नाव घेत नाहीये. संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर संपूर्ण वातावरण ढवळून निघालं. त्यानंतर आता पुन्हा एका घटनेनं बीड हादरलंय. एका शिक्षकाने बँकेच्या बाहेर फाशी घेऊन, स्वत:ला संपवलं. तसंच टोकाचा निर्णय घेण्याआधी गंभीर आरोप करत एक फेसबूक पोस्टही टाकली.**



बीडमध्ये एकाने फेसबुक पोस्ट करून गळफास लावून घेऊन आत्महत्या केली. बीड शहरातील कृष्णा अर्बन को-ऑपरेटिव बँक लिमिटेडच्या केज शाखेजवळ ही घटना घडली. धनंजय अभिमान नागरगोजे या ३० वर्षीय व्यक्तिने स्वत:चं आयुष्य संपवताना, आरोपींच्या नावाचाही उल्लेख केला आहे.
केज तालुक्यातील देवगावमध्ये राहणाऱ्या धनंजय नागरगोजे यांनी टोकाचं पाऊल उचलण्यापूर्वी अनेक फेसबूक पोस्ट केल्या. हे लोक मला हाल हाल करुन मारतील, मोठे लोक मला मारतील, मला आत्महत्या करण्याशिवाय पर्याय नाही अशा अनेक पोस्ट धनंजय नागरगोजे यांच्या फेसबूकवर टाकलेल्या दिसल्या. तसंच स्वत:ला संपवण्याआधी एक सविस्तर पोस्ट करत आपल्या मुलीची माफी मागितली आणि त्रास देणाऱ्यांची नावंही लिहिली आहेत.

**धनंजय नागरगोजेंची शेवटची फेसबूक पोस्ट...**

श्रावणी बाळा तुझ्या बापूला शक्य झालंच तर माफकर, मी माफी मागायच्या पण लायकीचा नाही. बाळा तुझ्या बाबतीत मी खूप स्वप्न पहितली होती पण त्या स्वणाना स्वप्नातच ग्रहण लागले काय करू माझ्या मनात कधी स्वार्थ आलाच नाही .कधी मी कुणाला दोन रू ला फसवल नाही किंवा कुणाचं कर्ज पण घेतल नाही.
श्रावणी बाळा शक्य झालंच तर कर एकदा तुझ्या बापूला माफ कारण तुला मी एकट्याला सोडून जात आहे .तुला आजुन काही कळत नाही तुझ वय आहेच किती, तीन वर्षे तुला काय कळणार ज्यांना कळायला पाहिजे त्यांना बापू कधी कळला नाही.बाळा बापूंनी कधीच कुणाचं नुकसान केलं नाही सर्वांसोबत चांगला लवागला पण या नालायक राक्षस लोकांनी माझा अंधारातून खूप छळ लावला आहे.
विक्रम बाबुराव मुंडे, विजय विक्रम मुंडे, अतूल विक्रम मुंडे आणि त्यांचे कार्यकर्ते उमेश रमेश मुंडे, गोविंद नवनाथ आव्हाड, ज्ञानेश्र्वर रजेभाऊ मुरकुटे या सर्वांनी माझा खूप छळ लावला आहे. मला हे हाल हाल करून मरणार आहेत. मला मारण्याचं करणं म्हणजे मी फक्त विचारलं होत की ,मी तुमच्या शाळेवर गेली १८ वर्षे झालं काम करतोय अजून मला पगार नाही आता पुढे काय करायचं त्यावर विक्रम बप्पा म्हणले तू फाशी घे म्हणजे तू मोकळा आणि मी पण दुसरा तुझ्या जागेवर कर्मचारी भरायला मोकळा हे एकूण माझ्या पाया खालची जमीनच सरकली आणि तीतून पुढे या लोकांनी मला त्रास देण्यास सूर्वात केली.
श्रावणी बाळा हे सर्व राक्षस आहेत या राक्षसा मुळेच मी तुझ्या पासून दूर जात आहे. तुला एकदा पाहण्याची माझी खूप इच्छा होती पण मी एक दळभद्री बाप तुझ्या वाटच्याला आलो. काय करू माझ्यापाशी कोणता पर्याय या लोकणी ठेवला नाही .
बाळा डोळ्यातलं पाणी थांबत नाही. पण त्याग केल्या शिवाय पर्याय नाही. श्रावणी मला माफ कर माफी मागण्याच्या पण लयकीचो नाही मी तरी पण शक्य झालं जेव्हा तुला कळेल तेंव्हा माफ कर आता मी थांबतो खूप त्रास होतोय मला.
विक्रम बाबुराव मुंडे, विजयकांत विक्रम मुंडे, अतूल विक्रम मुंडे, उमेश रमेश मुंडे, ज्ञानेश्वर राजेभाउ मुरकुटे, गोविंद (अमोल) नवनाथ आव्हाड, हे सर्व मझ्या माझ्या आत्महत्येला कारणीभूत आहेत .कारण यांनी मला खूप त्रास दिला आहे यांच्या मुळेच मी माझे जीवन संपवित आहे. आत्ता पर्यंत मी कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मोठ्या मनानी माफ करावे. सर्वांना माझा शेवटचा राम राम

**नेमकं काय होतं त्रासाचं कारण?**

धनंजय नागरगोजे हे केळगाव येथील कायम विनाअनुदानित आश्रम शाळेमध्ये शिक्षक होते. २०१९ मध्ये राज्य सरकारने २० टक्के अनुदान घोषित करण्यात आले होते. मात्र त्याची अंमलबजावणी झालीच नाही. गेल्या अनेक वर्षापासून शिक्षक म्हणून काम करत असताना अनेक अडचणी आल्याचं समजतंय. एकूणच, या घटनेनंतर बीड जिल्हा पुन्हा एकदा हादरला आहे. त्यामुळे पोलीस याप्रकरणी काय कारवाई करणार हे पाहणं महत्वाचं आहे.

## संघर्ष पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष अनिल गलांडे यांची महाराष्ट्ररत्न पुरस्कारासाठी निवड

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी संघर्ष पत्रकार संघ केज चे संस्थापक अध्यक्ष व केज तालुका प्रतिनिधी दैनिक तरुण भारत, बीड जिल्हाध्यक्ष ग्रंथालय कर्मचारी संघटना यांची महाराष्ट्र रत्न पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.
याविषयी सविस्तर वृत्त असे की तालुक्यातील चिंचोली माळी येथील रहिवासी व दैनिक तरुण भारत चे तालुका प्रतिनिधी, जिल्हाध्यक्ष ग्रंथालय कर्मचारी संघटना बीड, तसेच अध्यक्ष श्री संस्कार इंग्लिश स्कूल चिंचोली माळी आणि संचालक श्री संस्कार कॉम्प्युटर एज्युकेशन




चिंचोली माळी यांनी मागील पंधरा वर्षांपासून अविरत पत्रकारिता, सामाजिक क्षेत्रात व ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या न्याय हक्कासाठी दिलेले योगदान, तसेच शैक्षणिक क्षेत्रात केलेल्या भरीव कामगिरी बद्दल पुणे येथील साऊ ज्योती सोशल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा 'महाराष्ट्र रत्नगौरव पुरस्कार अनिल गलांडे यांना जाहीर झाला आहे. मागील १५ वर्षातील सामाजिक, ग्रंथालय, पत्रकारिता आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्याच्या योगदानाची दखल घेत यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याचे निवड समितीने जाहीर केले आहे. येत्या २३ मार्च रोजी पुणे येथे आयोजित पुरस्कार वितरण सोहळयात मान्यवरांच्या उपस्थितीत हा पुरस्कार अनिल गलांडे यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे स्वागत होत आहे.

## प्रसिद्ध युवागायक शिवाजी डाके व भारती जी यांचा लग्न सोहळा थाटामाटात साजरी

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील श्री क्षेत्र बाभळगाव या छोट्याशा खेड्यातील शेतकरी कुटुंबात युवागायक शिवाजी डाके यांचा जन्म झाला. आई मंदाकिनी डाके व वडील तुळशीराम जी डाके भाऊ संभाजी डाके सुरवातीचे शिक्षण बाभळगाव येथे ह.भ.प मारोती महाराज सुरवसे यांच्या कडे झाले. उच्च शिक्षण घेण्यासाठी श्री क्षेत्र आळंदी येते वडील तुळशीरामजी डाके व मारोती महाराज यांनी प्रसिध्द गायक राधाकृष्ण गरड गुरुजी यांच्या गुरुकुल मध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर आळंदी येथे श्रीराम मंदिर येते राहु लागले.
त्यामध्ये अनेक महाराष्ट्रभर कार्यक्रम करू लागले. गुरुजी सोबत प्रसिध्द कीर्तनकार रामायणाचार्य रामरावजी ढोक, समाजप्रबोधनकार निवृत्ती म इंदोरीकर, चैत्यन महाराज देगलूरकर, पुरुषोतम महाराज पाटील अश्या अनेक किर्तनकार मंडळी सोबत फिरण्याचा



योग आला. इंडीयन आयडॉल पुणे येते काम केले आहे. स्वर संगीत अकादमीची स्थापना केली. आज स्वर अकॅडमीच्या माध्मातून लोहगाव, वाघोली, धानोरी, विश्रांतवाडी, खराडी – चंदननगर, चऱ्होली या ठिकाणी शाखा कार्यरत अहेत. त्य.सद्या पुर्ण भारतभर कार्यकम छतिसगड, कोलकाता, दिल्ली, पंजाब, बेंगलोर, बेळगाव, गुजरात, राजस्थान असे पुर्ण भारतभर कार्यक्रम होतात. त्यांना इंडीयन आयडॉल बेस्ट संगीत टीचर अवॉर्ड, युवागायक पुरस्कार, युवारत्न पुरस्कार, बालरत्न पुरस्कार अशा अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले. अशातच त्यांना ऊचशिक्षित असणाऱ्या परभणी जिल्यातील सेलू येतील भारती जी घोलप याच्या सोबात विवाह सोहळा थाटामाटात पडला.
गुणवंत व्यक्तिमहत्व असणाऱ्या युवागायक शिवाजीराव डाके व भारतीजी डाके यांना आशीर्वाद देण्यासाठी भारतरत्न स्वरभास्कर पंडित भीमसेन जोशी यांचे शिष्य पंडित यादवराज फड गुरूजी, नगराअध्यक्ष भाऊसाहेब सोनवणे, तबलापटू अविनाश पाटील, मृदंगसम्राट मनोजजी भाडवलकर, मृदगसम्राट मोहन महाराज सावंत, तालमनी रामभाऊ काजळे, गायक रघुनाथ कोळसे, संदीप काटे, नवनाथ हांडे, सचिन खानेकर, माऊली इंगवले, काणेकर काका, विलास मोरे, गणेश कांबळे, चंद्रकांत गायकवाड अशा अनेक हजारों राजकीय सामाजिक मान्यवरांनी उपस्थिती लाभली. दोघानाही सुख समृद्धी आरोग्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना भावी वाटचालीसाठी दोघानाही खुप खुप शुभेच्छा.

## 'ग्रंथालय आपल्या दारी' या उपक्रमाने लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या ९३ जयंतीनिमित्त त्यांच्या पावन स्मृतीस कृतीशील अभिवादन...!

**महाराष्ट्राच्या राजकारण, समाजकारण, सहकार आणि शिक्षण क्षेत्रात अमूल्य योगदान देणारे लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांचा तेजस्वी, वैचारिक वारसा ग्रंथालयाच्या माध्येमातून जपला आणि जोपासला जात आहे. पवार साहेब केवळ राजकीय नेतेच नव्हे तर ते एक विचार, एक चळवळ आणि वैचारिक प्रगल्भता असणारे समाजाभिमुख व्यक्तिमत्व होते. समाजहितासाठी त्यांनी केलेले कार्य, घेतलेल्या पुढाकार आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. आज त्यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त ग्रंथालय आपल्या दारी या अभिनव उपक्रमाचा प्रारंभ होत आहे, ही निश्चितच समाजाच्या वैचारिक उन्नतीसाठी टाकलेले क्रांतिकारी पाऊल आहे. पुस्तकांची गाडी तालुकाभर अविरत ज्ञानाचा प्रसार करणार आहे, वाचन संस्कृती रुजवणार आहे आणि नव्या पिढीला बौद्धिक संपन्नतेच्या दिशेने प्रेरित करणार आहे. कन्नडच्या मातीत अशी वैचारिक चळवळ फुलवण्याचे ऐतिहासिक कार्य लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार ग्रंथालयाच्या माध्यमातून आदरणीय श्री. मानसिंहजी पवार बापूसाहेब करत आहेत.**

साहेबांच्या जयंतीनिमित्त आज ग्रंथालय आपल्या दारी या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ होतो आहे. हा केवळ उपक्रम नसून, तो वाचन संस्कृतीच्या जागरणाची चळवळ आहे. आजच्या डिजिटल युगात पुस्तकांकडे दुर्लक्ष होऊ नये, ज्ञानाच्या प्रकाशाने समाज उजळावा आणि वाचनसंस्कृती रुजावी, यासाठी कन्नडच्या मातीत हे ऐतिहासिक पाऊल उचलले जात आहे. या उपक्रमांतर्गत ग्रंथांनी भरलेली एक भव्य गाडी संपूर्ण कन्नड तालुक्यातील गावागावांत, शाळांनशाळांमध्ये फिरणार आहे. जिथे वाचनालय पोहोचू शकत नाही, तिथे हे फिरते ग्रंथालय ज्ञानाचे दीप उजळणार आहे. ग्रामीण भागातील लोकांपर्यंत उत्तमोत्तम ग्रंथ पोहोचावेत, विद्यार्थ्यांना अभ्यासाची नवी साधने उपलब्ध व्हावीत, आणि वाचनसंस्कृतीला नवसंजीवनी मिळावी, हा यामागील उद्देश आहे. हा उपक्रम महाराष्ट्रातल्या ग्रामीण भागात सुरू होणाऱ्या अतिशय मोजक्या उपक्रमांपैकी एक आहे. त्यामुळे



कन्नडच्या वैचारिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वारशात ही एक ऐतिहासिक भर आहे. असे मी मानतो.
सहकार महर्षी बाळासाहेब पवार वाचनालय हे समाजाच्या वैचारिक प्रबोधनाचे केंद्र बनत आहे. या वाचनालयाच्या माध्यमातून आजवर अनेक उपक्रम राबवले गेले आहेत. संगीत महोत्सवज्या व्यासपीठावरून स्थानिक कलाकारांना राष्ट्रीय स्तरावर पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे, फिल्म फेस्टिवलसामाजिक आणि वैचारिक चित्रपटांचे प्रदर्शन, व्याख्यानमाला विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांच्या विचारांना संधी देत, लोकप्रश्नांना वाचा फोडणारी व्याख्याने, फिरते वाचनालय ज्ञान गावागावांत पोहोचवणारी अभिनव संकल्पना, पुस्तक प्रकाशने आणि परिसंवाद नव्या लेखकांना मंच मिळवून देणारे उपक्रम, स्पर्धा आणि विद्यार्थ्यांसाठी विशेष शिबिरे ज्यातून नव्या पिढीतील विचारशील विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न होत आहे. आदी उपक्रम राबवले जात आहेत.
लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार हे एक धुरंधर राजकीय नेते तर होतेच त्याचबरोबर सामाजिक परिवर्तनाची आस असणारे, तसेच साहित्य आणि सांस्कृतिक चळवळीला बळ देणारे व्यक्तिमत्व तसेच एक ग्रंथप्रेमी, उत्तम वाचक होते, त्यांनी




कार्यकर्त्यांमध्येही वाचनाची आवड रुजवली होती. त्यांच्या ग्रंथप्रेमातूनच सुरु झालेले हे वाचनालय व त्यातून सुरू झालेला हा 'ग्रंथसंस्कृती जागर' खऱ्या अर्थाने साहेबांच्या विचार आणि कार्याचा वारसा पुढे घेऊन जात आहे. आज दि. १५ मार्च, २०२५ रोजी लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार यांच्या ९३ व्या जयंतीच्या पावन पर्वावर हा सृजनशील आणि क्रांतिकारी उपक्रम सुरू होतो आहे. या ऐतिहासिक सोहळ्याला आपण सर्वांनी उपस्थित राहून ज्ञानयज्ञाचा साक्षीदार व्हावे, हीच नम्र विनंती. लोकनेते, सहकार महर्षी बाळासाहेब पवार साहेबांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पावन विनम्र अभिवादन...!

**– डॉ. प्रकाश खेत्री**

# श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे प्रस्थान

लिंबागणेश । प्रतिनिधी

श्री गुरू ईश्वर बाबा भारती श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थान बेलगाव ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे श्रीसंत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज षष्ठी निमित्त दरवर्षी प्रमाणे याही वर्षी बीड तालुक्यातील बेलगाव येथील श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान ते श्रीक्षेत्र पैठण पायी दिंडी सोहळ्याचे आयोजन मठाधिपती ह.भ.प. महादेव बाबा भारती महाराज आणि ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. काल दि.१४ शुक्रवार रोजी सकाळी श्रीक्षेत्र बेलेश्वर व श्रीगुरु ईश्वर बाबा भारती यांचा अभिषेक करून पायी दिंडीचे प्रस्थान झाले. पायीदिंडीचे हे ११ वे वर्ष असुन मोठ्या संख्येने भाविक यात सहभागी झाले आहेत. टाळ मृदंगाच्या गजरात ग्यानबा तुकाराम च्या नामघोषात दंग दिंडीतील भाविकांचे दिंडी मार्गावरील भाविकांनी आकर्षक फुलांनी सजवलेल्या रथामध्ये



विराजमान महंत महादेव भारती महाराज व शांती ब्रम्ह तुकाराम महाराज यांची ठिकठिकाणी आतषबाजी करत, सडासमार्जन, रांगोळी काढून सुवासिनींनी पाद्यपुजन करत औक्षण करत मनोभावे स्वागत केले. ग्रामस्थांनी दिंडीतील भाविकांची ठिकठिकाणी चहा पाणी, लिंबु सरबत, नाष्टा यांची सोय करण्यात आली होती. काल दुपारच्या भोजणाची पंगत पिंपरनई ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आली होती. त्यानंतर पायी दिंडी मुक्कामी बेलखंडी गावाकडे मार्गस्थ झाली. पायी दिंडी सोहळा १४ मार्च ते २२ मार्च दरम्यान होत असुन पायीदिंडी बेलखंडी, बेलुरा, फुल सांगवी, अर्धपिंपरी, मुंगी, याठिकाणीहुन मार्गक्रमण करत दि.२१ मार्च रोजी पैठण येथे मुक्कामी पोहोचणार आहे. दि.२२ मार्च रोजी ह.भ.प. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज बेलेश्वर संस्थान बेलगाव यांच्या काल्याच्या किर्तनाने सोहळ्याची सांगता होणार आहे. नाथषष्ठी सोहळ्यात भजन, किर्तन, भारूड, संगीत भजन आदी कार्यक्रमांची मेजवानी असते. भाविकांच्या जेवणाची आणि मोफत जेवणाची सोय संस्थानच्या वतीने केली जाते. शांतीब्रम्ह तुकाराम महाराज भारती यांच्या अथक प्रयत्नाने पायी दिंडी सोहळ्याला वेगळे स्वरूप आले असुन पायीदिंडीत सहभागी होणाऱ्या पंचक्रोशीतील भाविकांचा सहभाग उत्तरोत्तर वाढत आहे.


## सोमवारी भगवानगड दिंडीचे होणार पैठणकडे प्रस्थान

भगवानगड । प्रतिनिधी

शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दरवर्षी संपूर्ण महाराष्ट्रातून अनेक साधुसंतांच्या दिंड्या पैठणला जातात.



श्री क्षेत्र भगवानगड संस्थानची सुद्धा दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी नाथांच्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त दिंडी पैठणला जाणार आहे. या सोहळ्याला 'नाथषष्ठी' असे म्हणतात. या सोहळ्यासाठी भगवानगडाचे सर्व भक्त गडावर येऊन सोमवार दि.१७ मार्च रोजी दुपारी ठीक १ वाजता ह.भ.प.श्रीगुरु न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा यांच्या अध्यक्षतेखाली दिंडी सोबत पैठणकडे प्रस्थान करणार आहेत. या दिंडी सोहळ्याचा पहिला मुक्काम राणेगावमध्ये, दुसरा मुक्काम प्रभूवाडगावमध्ये असून तिसऱ्या मुक्कामी दिंडी पैठणमध्ये पोहोचते. दिंडी सोहळ्या दरम्यान भगवानगडावरील युवा कीर्तनकार, सर्व साधकवर्ग व गडाचा संपूर्ण भक्तवर्ग मोठ्या आनंदामध्ये 'भानुदास एकनाथ' नामाचा गजर करत मार्गक्रमण करतो. वारीमध्ये चालताना पहाटे काकडा भजन, आंधळा, पांगळा, वासुदेव, गौळणी इत्यादी होतात. त्यानंतर दुपारचे अभंग गायले जातात. यामध्ये समाधीचे अभंग, पत्रिकेचे अभंग इत्यादींचा समावेश असतो. सायंकाळी ४ वाजता श्री संत ज्ञानेश्वर महाराजांचा हरिपाठ व शांतीब्रह्म श्री संत एकनाथ महाराजांचा हरिपाठ होतो. हरिपाठानंतर सर्व वारकर्यांना नियोजित ग्रामस्थांतर्फे जेवणाची पंगत दिली जाते. रात्री ८ ते १० या वेळेमध्ये कीर्तनाचा कार्यक्रम असतो. कीर्तनानंतर जागर केला जातो. दिंडी पैठणमध्ये पोहोचल्यानंतर नाथवंशज दरवर्षी भगवानगडाच्या फडामध्ये येऊन भगवानगडाच्या दिंडीला नाथषष्ठी सोहळ्यामध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण देतात. श्री क्षेत्र भगवानगडाच्या फडामध्ये नाथांच्या समाधी सोहळ्याचा काला होईपर्यंत दररोज पहाटे काकडा भजन, दुपारचे भजन, दोन्ही हरिपाठ, हरिकीर्तन, हरीजागर इत्यादी सर्व धार्मिक नित्यनियम पार पाडले जातात.



## नवीरा बागवान चा पहिला रोजा पूर्ण

बीड । प्रतिनिधी

शहरातील कागज़ी दरवाजा परिसरात राहणारे नवीद फिरोज बागवान यांची ७ वर्षीय कन्या नवीरा हिने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला याबद्दल तिचे अभिनंदन होत आहे. इस्लाम धर्मातील पवित्र रमजान महिना सुरू होऊन आतापर्यंत १३ रोजे पूर्ण झाले आहेत. सुरुवातीला जवळपास १० रोजेपर्यंत वातावरणात अचानक आलेल्या थंडीच्या लाटेमुळे रोजेदारांना उन्हाची दाहकता जास्त जाणवली नाही. ११ व्या रोज्यापासून थंडीची लाट ओसरली आहे. आता सूर्याने आग ओकायला सुरुवात केल्याने सर्वसामान्यांसह रोजेदारांच्या अंगाचीही लाहीलाही होत आहे. असे असतानाही या उष्ण आणि तप्त वातावरणात सुद्धा मुस्लिम समाजातील लहान-लहान मुले-मुली रमजान महिन्याचे रोजे ठेवत आहे. अशाच प्रकारे नवीरा बागवान या ७ वर्षीय मुलीने आपल्या आयुष्यातील पहिला रोजा पूर्ण केला. यामुळे तिचे दादा-दादी, अम्मी-अब्बू, चाचा-चाची आणि सर्व बहिण-भावांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## घनकचऱ्याच्या होळीप्रमाणे मानवी मनातील द्वेष, मत्सर व भेदाभेद या भावनेची होळी होणे अत्यंत गरजेचे : प्रा. तात्यासाहेब डोईफोडे

बीड । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथील माजी सरपंच व श्याम माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पवित्र असं ज्ञानदानाचे कार्य करणारे डोईफोडे सर यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे की आपण आपल्या हिंदू संस्कृतीनुसार होळीचा सण मोठ्या उत्साहात आणि आनंदात साजरा केलेला आहे त्यामध्ये आपण पर्यावरणातील घनकचरा, पर्यावरणास प्रतिकूल असणाऱ्या वस्तू व प्लॅस्टिक याची देखील आपण होळी केलेली आहे सणसमारंभ हे संस्कृतीचे जतन करण्यासाठी केले जातात सण समारंभाच्या माध्यमातून सामाजिक एकोपा वाढीस लागतो पण आज हल्ली समाज दुभंगू लागला आहे.



सामाजिक सलोखा कमी होऊ लागलेला आहे एकमेकाचे संबंध तुटू लागलेले आहे समाजात जातिभेद वाढलेला दिसतोय एखादा माणूस आपल्यापुढे जात असेल तर त्याचे पाय मागे ओढण्याची प्रवृत्ती वाढलेली दिसत आहे एकमेकाविषयीचा द्वेष वाढलेला दिसत आहे या सर्व गोष्टी सामाजिक एकोप्यास घातक आहे जगद्गुरु संत ज्ञानेश्वराने हे विश्वचि माझे घर असे म्हटलेले आहे राष्ट्रीय संत भगवान बाबा, श्री गुरु बंकट स्वामी महाराज या सर्व साधू संताने समाज जोडण्याचे काम केले आज आपल्या छत्रपती शिवाजी महाराज, शाहू फुले व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेली शिकवण मनात सतत ठसत राहावी म्हणून आपल्या मनातील द्वेष, मत्सर व भेदाभेद या भावनेची होळी करून सामाजिक सलोखा वएकोपा निर्माण करणे आवश्यक आहे असे माजी सरपंच प्राध्यापक तात्यासाहेब डोईफोडे यांनी प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे म्हटले आहे.

## सिरसाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती यांच्या १३४ व्या जयंती उत्सव समितीची कार्यकारणीची बैठक

सिरसाळा । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सिरसाळा येथे २०२५ सम्राट अशोक बुद्ध विहार येथील बुद्ध बांधव व यशोधरा महिला मंडळ व भीमसैनिकांची साप्ताहिक वंदना घेऊन या बैठकीला सुरुवात करण्यात आली. सम्राट अशोक बुद्ध विहार सिरसाळा या ठिकाणी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या सर्वजनिक जयंतीनिमित्त कार्यकारणीची बैठकीचे आयोजन यावेळी अध्यक्षस्थानी आयु. सुभाष जिजा चोपडे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली.

महापुरुषांच्या प्रतिमा ना अभिवादन करण्यात आले. जयंती उत्सव समिती २०२४ च्या सर्व पदाधिकाऱ्यांचे वर्षभर राबवलेल्या सामाजिक कार्यक्रम व साप्ताहिक वंदना, बुद्ध जयंती, रमाई जयंती गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, शाहू महाराज जयंती, वृक्षारोपण, पौर्णिमा, भंतेजीची धम्मदेशना, विद्यार्थी दिवस,



संविधान दिन, महापरिनिर्वाण दिन, भीमा कोरेगाव दिन व माता सावित्री जयंती, राजमाता जिजाऊ जयंती, नामविस्तार दिन, माता रमाई जयंती, छत्रपती शिवाजी महाराज जयंती. व अहिल्याबाई होळकर जयंती महात्मा फुले जयंती, संत सेवालाल महाराज जयंती असे सामाजिक उपक्रम राबवले जातात. सर्व महापुरुषांच्या या विहारात जयंती साजरी केल्या जातात व प्रत्येक रविवारी बुद्ध विहारात साप्ताहिक बुद्ध वंदना घेतली जाते. विविध आंदोलन व मोर्चा या केलेल्या कार्याबद्दल आयु. बाबासाहेब बळीराम किरवले. यांच्या वतीने सत्काराचे आयोजन करण्यात आले. पुष्पहार, शाल, फेटा बांधून २०२४ ची जयंती उत्सव कमिटी चा सत्कार करण्यात आला.

त्यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त २०२५ व १३४ व्या जयंती उत्सव समितीचे एकमताने कार्यकारणीची बैठकीमध्ये निवड करण्यात आली. जयंती कमिटीचे अध्यक्ष आयु. अच्युत बाप्पा किरवले, उपाध्यक्ष सुरेश विष्णू उजगरे व हर्षवर्धन चोपडे, सचिवपदी सुभाष जिजा चोपडे, कोषाध्यक्ष मधुकर नाना किरवले, कोषाध्यक्ष अध्यक्ष सोमेश्वर किरवले. पेंटर वरील कार्यकारणी धम्म बांधवांनी जयंती उत्सव च्या वर्षभर चालणाऱ्या कार्यक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी २०२४ जयंती कमिटीचे अध्यक्ष आयु. अच्युत बाप्पा किरवले यांनी खूप असे वर्षभरासाठी खूप असा वेळ देऊन बौद्ध विहाराच्या कामासाठी लक्ष घालून वर्षभरासाठी त्यांनी खूप काम पाहिले आहे. यासाठी योगदान दिले त्यासाठी याही वर्षी आंबेडकर जयंती साठी २०२५ जयंती उत्सव साठी परत एकदा विश्वरत्न. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती कमिटीचे अध्यक्षपदी आयु. अच्युत बाप्पा किरवले यांची फेर निवड करण्यात आली तरी त्यांचे बौद्ध बांधवांनी व कमिटी ने त्यांचे स्वागत व त्यांचा सत्कार करण्यात आला.

डॉ. विश्वरत्न बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव २०२४ चा जो लेखाजोखा आहे ते अत्यंत लक्ष घालून झालेल्या खर्चाचा हिशोब ठेवणारे व देणारे कॉलेजचे प्रा. धनवे सर, प्रा. साबळे सर, प्रा. झुंजुर्डे सर गेल्या अनेक १४ वर्षापासून एकत्रित जयंती उत्सव समितीचा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात चालू आहे. व त्याचा पूर्ण हिशोब देण्यात येतो त्याबद्दल ही सरांचा जयंती कमिटी च्या वतीने ने सत्कार करण्यात आला.

## महान व्यक्तीमत्व समाज भूषण बाबुरावजी हिवाळे यांना महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार

बीड । प्रतिनिधी

पुणे येथील साऊ-ज्योती सोशल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार समाज भूषण असणारे सर्वांचे मार्गदर्शक आदरणीय बाबुरावजी हिवाळे साहेब यांना जाहीर झाला आहे. मागील ३० पासून प्रसिद्धीच्या पडद्याआढ असणारा परंतु कायम स्वरूपी समाजाच्या न्याय हक्कांसाठी प्रामाणिकपणे कार्य करणारा एक सच्चा लढवय्या नेता. म्हणजे आदरणीय बाबुरावजी हिवाळे आपल्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदानाची दखल घेत बाबुरावजी हिवाळे यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल बाबुरावजी हिवाळे साहेब आपणास हार्दिक हार्दिक शुभेच्छा.



प्रामुख्याने मुक्ता साळवे अभ्यासिकेच्या माध्यमातून समाजातील विद्यार्थ्यांसाठी खऱ्या अर्थाने बाबुरावजी हिवाळे यांनी समाजातील बहुतांश सहकारी बांधव आणि तरुणाच्या मदतीने समाजातील विद्यार्थ्यासाठी शिक्षणाचे दार खुले करून दिले गरजू आणि गुणवंत विद्यार्थ्यांना अनेकदा इच्छा असूनही जागेअभावी अभ्यास करता येत नाही. अशा विद्यार्थ्यांसाठी समाजातील समाज मंदिरात विनामूल्य अभ्यासिका उपक्रम चालावी हा त्यांचा प्रामाणिक उद्देश होता. शिक्षणाचे महत्त्व आणि गरजू व गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आवश्यक सुविधांची जाणिव बाळगून समाजातील तरुणांना हाताशी घेत मुक्ता साळवे अभ्यासिका निर्माण केली. अंगी गुणवत्ता असूनही केवळ परिस्थितीमुळे कोणत्याही बहुजन विद्यार्थ्याच्या शिक्षणात खंड पडू नये, या उदात्त हेतूने बाबुरावजी हिवाळे यांनी विद्यार्थ्यासाठी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत समाजात शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी बाबुरावजी कायम कटिबद्ध असतात.

मुख्य म्हणजे कोरोना काळात समाजातील सर्वच घटकांना खूप मोठा फटका बसलेला होता. कोरोनाग्रस्त गंभीर रुग्णांना उपचारासाठी हॉस्पिटल मिळत नव्हते, व्हेंटिलेटर बेड मिळत नव्हते, ऑक्सिजन बेड व म्बुलन्स मिळत नव्हती हॉस्पिटलवाले अवाजवी, जास्त बिल आकारून सामान्य लोकांची लूटमार करत होते तसेच लोकांचा उदरनिर्वाह अन्नपान्याचा प्रश्न तोंड काढून उभा होता अश्या गंभीर आणि भयानक परिस्थितीत सर्वसामान्य जनतेच्या मदतीला धावून आलेला हा देवमाणूस, गरिबांचा कैवारी, सर्वसामान्य जनतेच्या मदतीला धावून जाणारा खरा लोकनेता बाबुरावजी हिवाळे स्वतच्या जीवाची परवा नकरता खंबीरपणे सर्वसामान्यांसाठी रात्रं दिवस कार्य करीत होता. असे महान व्यक्तीमत्व आदरणीय बाबुरावजी हिवाळे यांना पुणे येथील साऊ-ज्योती सोशल फाउंडेशनच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्ररत्न गौरव पुरस्कार समाज भूषण असणारे सर्वांचे मार्गदर्शक आदरणीय बाबुरावजी हिवाळे साहेब यांना जाहीर झाला आहे.या निवडी बद्दल आदरणीय बाबुरावजी हिवाळे साहेब आपणास हार्दिक हार्दिक शुभेच्छा.पुढील वाटचालीस आपणास हार्दिक शुभेच्छा.

## वस्ताद बाळू आबा आवरे यांचा गावकऱ्यांच्या वतीने सत्कार



बीड । प्रतिनिधी

लाल व काळ्या मातीतील वस्ताद बाळू आबा आवरे यांचा उखळवाडीतील कुस्तीच्या फडा मध्ये गावकऱ्यांच्या वतीने साल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. शिवसेनेचे तालुकाप्रमुख सोपान काका मोरे उखळवाडी गावामध्ये पारंपारिक पद्धतीने जसं आमच्या पूर्वजांनी उखळवाडी गावामध्ये जत्रा चालू केली. मागील अनेक वर्षापासून मागील अनेक पेढ्यांना पार चालू असलेली जत्रा आज नवीन पिढीने देखील उखळवाडी गावातील जत्रा आनंद उत्सवामध्ये चालू ठेवलेली आहे. यापुढेही उखळवाडी गावातील जत्रा हगामा कुस्त्याचा फड हा चालूच राहणार आहे.

उखळवाडी गावामधील आमच्या पूर्वजांनी आजोबा पंजोबा खबर पंजोबा व सर्वच पूर्वज यांनी जो जो कार्यक्रम जुन्या पद्धतीचा चालू केलेला आहे तो आम्ही देखील पुढे चालूच ठेवणार आहेत मग त्यामध्ये गावची जत्रा असेल सप्ताह असेल नवरात्र महोत्सव असेल आखाडी यात्रा असेल श्रावणी कार्यक्रमातील अनेक जुने कार्यक्रम आम्ही चालूच ठेवणार आहोत. उखळवाडी गावामध्ये कुस्तीचा लाल माती व काळ्या मातीमधील कुस्तीचा फड कायमस्वरूपी धुरळा उडत राहणार गावकऱ्यांच्या आशीर्वादाने यापुढेही उखळवाडी गावामध्ये वेगवेगळे कार्यक्रम हमेशा चालूच राहणार पुढच्या वर्षी उखळवाडी गावामधील काळ्या मातीतील लाल मातीतील शेवटची कुस्ती म्हणजे दवंडीची कुस्ती ही दहा हजारावर खेळली जाणार आहे.

## असत्यावर सत्याचा विजय मिळू दे, निराशावर मात करून आशेचा किरण वसु दे, अपयशावर यशाचा पताका फडकू दे

सर्वांना होळीच्या या पवित्र सणानिमित्त माझ्याकडून व माझ्या परिवारजना कडून खूप खूप शुभेच्छा. हा सण म्हणजे आपल्यातील वाईट वृत्तींचा त्याग करून चांगल्या प्रवृत्ती आत्मसात करण्याची शिकवण देतो. ज्या प्रमाणे अहंकाराने भरलेला हिरण्याकश्यप राजा ज्याने ईश्वराच्या सर्वश्रेष्ठ अवतरला देखील हीन समजले समझले, त्याच्याच पोटी जन्माला आलेला भक्त प्रल्हाद जे विष्णू चे परम भक्त होते, ज्यांनी आपल्या भक्तीने वडीलाच्या वाईट हेतूवर विजय मिळवला त्याचेच प्रतीक म्हणजे आज आपण होळी साजरा करतो. या सणाचे महत्त्व म्हणजे मनुष्याने अहंकार, लोभ, लालच दुसऱ्यांबद्दल घृणा तिरस्कार अशा आवगुणांचा त्याग करून इतरांप्रती आदर, सन्मान, प्रेम व करुणा यांचा स्वीकार करणे. अशी शिकवण आपल्याला आपल्या पूर्वजांनी दिली. दिवसेंदिवस मात्र आपण चांगल्या वृत्ती आत्मसात करणे ऐवजी अजूनच वाईट कृती करण्यावर भर देत आहोत.



होळीचे पावित्र्य अजून एक असे सांगितले जाते की, श्रीकृष्णाजी नी आपल्या परमप्रिय राधाजी यांना सर्वप्रथम रंग लावून आपल्या प्रेयसीबद्दल प्रेम व्यक्त केले. असे या पवित्र सणाचे महत्त्व आहे मात्र कुठेतरी आपण या पवित्र्याला विसरून जात आहोत. हा सण म्हणजे उल्हास उत्साह उमंगाचा सण आहे ज्यात सर्वजण आनंदाने एकत्र येऊन द्वेष विसरून रंगाच्या माध्यमातून पुन्हा त्याच जोमात सहवासात येतात.आज पूर्ण जगभरामध्ये ज्या ज्या ठिकाणी भारतीय वसलेले आहेत, त्या त्या ठिकाणी होळी दिवाळी अतिशय उत्साह आणि उमंग मध्ये पार पडत आहे. परकीयांना देखील भारतीय परंपरा आज प्रिय वाटत आहे. त्याचेच एक प्रतीक म्हणजे जसा भारत आधी अध्यात्मात जगासाठी विश्वगुरू होता. तसाच आज अध्यात्मबरोबरच तंत्रज्ञानात देखील विश्वासगुरु झाला असून जगाला दिशा देण्याची काम करत आहे.

मी राधिका डव्हान्स योग सेंटर च्या संचालिका या नात्याने प्रत्येक सण महिलांसमवेत तितक्याच उत्साह व उमंगाने साजरा करत असते. महिलांचे नुसते शारीरिक आरोग्य सुदृढ ठेवणे एवढेच माझे लक्ष्य नसून त्यांना मानसिक सांस्कृतिक तसेच अध्यात्मिक मार्गाने सशक्त करणे यावर माझा भर असतो. संचालिका या नात्याने ट्रेकिंग आयोजित करणे, चर्चासत्र घेऊन मन मोकळा संवाद साधणे जमेल तशी छोटीशी सहल घेऊन जाणे तसेच क्लासमध्ये अधून मधून डान्सच्या माध्यमातून त्यांना तणावातून मुक्त करणे यावर माझा भर असतो. आपल्या समाजाला एक उत्तम दिशा द्यायची असेल तर आपल्याला महिलां बद्दल परमोच्य आदर आणि सन्मान दिला पाहिजे आणि जो आज खूप छान प्रमाणात दिसून येत आहे. याचा आनंद देखील आहे. पुन्हा एकदा होळी निमित्त सर्वांच्या जीवनात सप्तरंगाप्रमाणे आनंद, हर्ष उल्हास आणि यश प्राप्त व्हावे हीच ईश्वरचरणी माझ्याकडून व माझ्या परिवारमय योग सेंटरच्या डॉ राधिका ताबे याच्या कडून ईश्वराला प्रार्थना आणि सर्वांना खूप खूप शुभेच्छा.

-डॉ. राधिका ताबे.
योगाराधिका ॲडव्हान्स योग सेंटर संचालिका

# बोगस काम करणारे इंजिनियर लांडेचा तलवाड्याचा चार्ज काढला

## ■ चार्ज काढून भागणार का वसुली ही लांडे करूनच झाली पाहिजे ■ शासनाच्या लाखो रुपयाला चुना लावणाऱ्या लांडे वर निलंबनाची कारवाई हवी ■ जिल्हाधिकारी पाठक साहेब लांडेच्या कार्यकाळातील माहिती घेऊन कारवाई करा

तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा सर्कल मध्ये ५०० ते ६०० बोगस घरकुलाचे घरे न बांधता यांची निर्विशाल लांडे यांनी कसलेही खातर जमा न करता लाखो रुपये मलिदा पायी बोगस लाभार्थ्यांच्या नावे आहे जमा करून शासनाच्या लाखो रुपयाला सरकारी बाबू करूनच चुना लावल्याचा प्रकार दैनिक आरंभ ने उघडकीस आणला होता याची दखल घेत गेवराई पंचायत समितीने इंजिनियर लांडेचा तलवार याचा चार्ज काढून घेतला असून शेवटी बदली करून चालणार नसून इंजिनिअर लांडे तात्काळ निलंबन करण्यात यावे अशी मागणी होत असताना दिसून येत आहे.


सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ e फेक्ट

आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात - मो.9860898564

इंजिनीयर विशाल लांडे यांनी घरकुलाचे नियम वेशीला टांगले का?

घरे न बांधताच लाखो रुपये बोगस लाभार्थ्याच्या खात्यावर

■ बोगस लाभार्थ्याला टाकलेली रक्कम इंजिनियर लांडे यांच्याकडून वसूल होणार का? का

आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात - मो.9860898564

मॅडम यांच्या आशीर्वादाने इंजिनियर लांडे ...लिदा घेऊन पुन्हा सोडले बोगस घरकुल हप्ते

■ तक्रार देऊनही वरिष्ठांच लांडेंना पाठबळ ■ नियम फक्त गरिबाला, पैसे वाल्याला घर न बांधता हप्ते ■ सामाजिक कार्यकर्ते उपोषणास बसणार

...डा । प्रतिनिधी
...गेवराई पंचायत समिती कार्यालयातील कंत्राटी इंजिनिअर विशाल लांडे यांनी नियमाला केराची टोपली दाखवत पंतप्रधान आवास योजना, तसेच मोदी आवास योजना या गोरगरीब जनतेसाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ही योजना लागू करण्यात आली आहे मात्र लांडे यांनी या योजनेचे कागदी घोडे नाचू मलिद्या पायी जो तीन हजार रुपये देईल त्याला हप्ता इकडे तुम्ही घरी ही बांधू नका असा राज रोजपण चालू असून भ्रष्ट पंचायत समिती अशा इंजिनियर व कारवाई करत नसून लवकर सामाजिक कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयावर उपोषणास बसणार आहेत.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा तसेच परिसरात इंजिनियर लांडे हे लाभार्थ्यांनी घर पाहून घराच्या बांधकाम नुसार किती रक्कम सोडायची हे देखरेखी साठी नियुक्त केलेले आहे. इंजिनिअर विशाल लांडे यांनी कसलीही खातर जमा न करता साधा कुणी पायाही खदला नसताना अशा लाभार्थ्याला लिनटल लेवल दाखवून तिसरा हप्ता सोडल्याचे उघडकीस येत असून तर काही लाभार्थ्यांना फाउंडेशन लेव्हल दाखवून दुसरा हप्ता सोडल्याचेही ऑनलाइन द्वारे उघडकीस आले असून वरील सोडलेले हप्तानुसार असे ५० ते ६० लाभार्थी अकाउंट वरती पैसेही जमा झाले आहे.

इंजिनीयर लांडे यांनी असेच केले तर नियम फक्त गरिबालाच का काही दिवसापूर्वी गटविकास अधिकारी कांबळे मॅडम यांना चौकशीसाठी निवेदनही देण्यात आले होते. मात्र कांबळे मॅडम यांनी कसल्याही प्रकारची खातर जमा न करता इंजिनीयर विशाल लांडे यांना अशी बोगस काम करण्यास सांगितले का? असा प्रश्न सर्वसामान्यातून पडत असून गटविकास अधिकारी कांबळे मॅडम साधे एका तक्रारीची सुद्धा चौकशी करू शकत नाहीत का? का इंजिनियर लांडे यांनाच पाठबळ देण्याचे काम करत आहेत का? असे अनेक प्रश्न गटविकास अधिकारी यांच्या बद्दल ग्रामस्थातून होत आहे असं पाहून गेवराईची पंचायत समिती बिहारची पंचायत समिती झाली का तरी या प्रकरणाची सखोल चौकशी करून ज्या लाभार्थ्यांचे बोगस पिले सोडले आहे असे जिओ टॅग करणारे इंजिनियर यांनी कुठले फोटो काढले.

ज्या लाभार्थ्यांनी अक्षरश विट सुद्धा लावली नाही आशांच्या नावावर सतर हजार रुपये जमा कसे होतात पी टी आर एकच असे प्रकारे बोगस जियो टॅग करून मलिदा जमा करण्याचे काम इंजिनीयर लांडे यांनी केले असून तरी याची चौकशी होऊन सर्व रक्कम इंजिनियर करून वसूल करण्यात यावी यासाठी लवकरच पंचायत समिती किंवा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते उपोषणास बसणार आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण)

जिल्हाधिकारी पाठक साहेब यांच्याकडून इंजिनिअर कडून बोगस सोडलेले हप्ते वसूल करून कारवाई करण्याची मागणी

01 Mar 2025 - Page 4 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134



याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा ग्रामपंचायतला मोदी आवास योजना तसेच पंतप्रधान आवास योजना उद्दिष्ट आले होते एकूण उद्दिष्टे अंदाजे ५०० ते ६०० च्या दरम्यान होते सर्व लाभार्थ्यांची प्रक्रिया करू पंचायत समिती या ठिकाणी दाखल करण्यात आली लाभार्थ्यांच्या फाईल मंजूर होऊन पहिला हप्ता पंधरा हजाराचा ऍडव्हान्स सोडण्यात आला तर नियमानुसार लाभार्थी कसे काम करतात काम कुठपर्यंत आलं हे पाहण्यासाठी कंत्राटी इंजिनियर नियुक्त करण्यात आलेला होता तलवाडा सर्कलला विशाल लांडे यांची नियुक्ती करण्यात आली होती त्यांनी चार्ज घेतल्यापासून कुठल्याच लाभार्थ्यांनी साधा पाया खदला नसता आशा लाभार्थ्यांच्या नाव ७० ते ८५ हजारापर्यंत रक्कम दोनशे ते अडीचशे जणांच्या अकाउंट वर जमा करण्यात आली हा प्रकार सगळा पैसे घेऊन केलेला असून याची चर्चा परिसरात चांगलीच होत असताना दैनिक आरंभ ने वारंवार हा प्रकार उघडकीस आणल्यानंतर इंजिनीयर लांडे यांचा तात्काळ चार्ज काढून घेण्यात आला मात्र चार्ज काढून जमणार नसून शासनाच्या लाख रुपयांना एक प्रकारे चुना लावण्याचा प्रकार इंजिनियर करून करण्यात आला असताना ऑनलाईन द्वारे ही सर्व माहिती जग जाहीर होत असताना अशा इंजिनिअर नियमानुसार कारवाई होऊन तात्काळ निलंबित करण्यात यावे अशी मागणी होत असून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दखल घेऊन तात्काळ कारवाईची मागणी होताना दिसून येत आहे.




# पंचायत समिती कार्यालयासमोर मनुर येथील नागरिकांचे आमरण उपोषण

माजलगांव । प्रतिनिधी

येथील राहुल शिरसागर व नागरिक पंचायत समिती कार्यालय माजलगाव या ठिकाणी आमरण उपोषणाला बसले होते. मनूर ग्रामपंचायत येथील ग्रामसेवक हे सतत गैरहजर असणे गावामध्ये न येणे नागरिकांच्या समस्या न सोडवणे पी टी आर साठी नागरिकांना चकरा मारायला लागतात ग्रामसेवक कार्यालयी हजर नसतात. नागरिकांना उद्धट व अरेरावीची भाषा करणे, व मनमानी कारभार करणे असे उपोषणकर्त्यांचे म्हणणे आहे.




ग्रामसेवक यांच्या अनेक तक्रारीबाबत तसेच ग्रामपंचायत मधील गैर व्यवहार व अनेक बोगस व निकृष्ट दर्जाच्या कामाबाबत पंचायत समिती बीडीओ यांच्याकडे वारंवार तक्रार अर्ज व निवेदने देऊनही कुठलीही कारवाई केली जात नाही यामुळे मनुर येथील राहुल क्षीरसागर व गावातील नागरिक यांनी ग्रामसेवक यांच्यावर कारवाई करण्याची मागणी केली या मागणीसाठी पंचायत समिती कार्यालया समोर आमरण उपोषण करण्यात आले.

# औरंगजेबाची कबर ताळेबंद करा, जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांची मागणी

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसापासून छावा चित्रपटाच्या माध्यमातून धर्मांधतेची जी ठिणगी पेटली आहे, त्यामुळे औरंगजेबाच्या विषयावरून महाराष्ट्रासह देशाचे मानसिक तसेच राजकीय वातावरण खराब होताना दिसत आहे. या महाराष्ट्रात औरंगजेबाचे समर्थन होणे, हे समस्त शिवभक्तांच्या भावना दुखावणारे असून, खुलताबाद येथील औरंगजेबाची कबर कायमस्वरूपी ताळेबंद करावी अशी मागणी करत जागर प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने जागर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. किसन पाटील चव्हाण यांनी बीड जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे.

यावेळी वेगवेगळ्या संघटनांच्या माध्यमातून शिवकार्य जागृत ठेवणारे शिवभक्त सूरज जायभाये, स्वप्नील वरपे, बीड जिल्हाध्यक्ष संगम चाळक, शहर अध्यक्ष अनिकेत बांगर, भारत खरात, संग्राम ढोले, कृष्णा जाधव, धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान चे संदीप भैया चाळक, अजयसिंग काळे पाटील, तसेच भगवाधारी प्रतिष्ठान चे कृष्णा जाधव आदी शिलेदार उपस्थित होते.



# रक्त तपासणी विभाग वेळेपूर्वीच कुलूप बंद

**गेवराईच्या उपजिल्हा रुग्णालयात रुग्णांची गैरसोय; खाजगी लॅबमध्ये आर्थिक झळ**

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई शहरातील उपजिल्हा रुग्णालय येथे रुग्णालयातील रक्त तपासणी विभाग हा वेळेपूर्वीच बंद होत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक झळ सोसावी लागत आहे त्यामुळे रुग्ण आणि नातेवाईकांमधून रुग्णालयाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.बीड – जालना राष्ट्रीय महामार्गावर उपजिल्हा रुग्णालय हे गरजू रुग्णांसाठी मोठा आधार आहे मात्र रुग्णालयाच्या कारभाराबाबत तसेच सुविधा या सध्या रामभरोसे असल्याचे दिसून येत आहे.

त्याबाबत नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे उपजिल्हा रुग्णातील कर्मचाऱ्यांच्या येण्याच्या आणि जाण्याच्या वेळा निश्चित नसल्याने नागरिकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे उपजिल्हा रुग्णालयातील नागरिकांच्या सेवेसाठी असलेले रुग्णालय हे सकाळी वेळेत सुरू होत जरी असले तरी दुपारनंतर वेळेवर येत नसल्याची चर्चा सध्या सर्व परिसरात सुरू आहे परंतु बंद होण्याच्या पूर्वीच अनेक सेवा बंद केल्या जात असल्याची नागरिकांमध्ये जोरदार चर्चा चालू आहे. रक्त तपासणी लॅब ही सातत्याने दररोज सकाळी उघडली जाते परंतु दुपारनंतर या विभागांची लॅब बंद असल्याचे सांगितले जाते. रुग्णालयाचे अधीक्षक हे कर्तव्यदक्ष असून रुग्णालयातील कर्मचारी वर्ग त्यांना मानावे असे सहकार्य करीत नसल्याची चर्चा आहे त्यामुळे अनेक रुग्णांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. बाह्य रुग्ण विभागात रुग्णांची रांग असताना देखील वेळेच्या आधी या ठिकाणी रक्त तपासणीसाठी असणारी प्रयोगशाळा देखील वेळेच्या आधीच बंद करून कर्मचारी कुलूप लावून निघून जात असल्याचा आरोप यावेळी रुग्णांनी केला. रुग्णांना मात्र बाहेरून रक्त तपासणीसाठी खिशाला आर्थिक झळ सोसावी लागत आहे मात्र यावर कुणी पुढे येऊन बोलायला तयार होत नाही रुग्णालयात रुग्णांना सेवा देण्याच्या नावाखाली कर्मचारी मात्र त्या रुग्णांना उद्धट बोलून त्यांची बोलती बंद केल्याचा प्रकार अनेक वेळा घडला आहे. त्यामुळे तात्काळ वरिष्ठ अधिकारी यांनी लक्ष घालून संबंधित कर्मचाऱ्यांना वेळीच सूचना देऊन लॅब सुरू करण्यात यावी अशी मागणी टायगर ग्रुप चे युवा नेते संकेत भैय्या गांगुर्डे यांनी केले आहे.



# धनंजय देशमुखांचा साडू दादा खिंडकरवर गुन्हा दाखल



बीड । प्रतिनिधी

दादा खिंडकर यांनी आज बीडच्या एसपी ऑफिसमध्ये स्वतःला. बीड पोलिसांसमोर सरेंडर केल्याचे पाहायला मिळाले. सध्या दादा खिंडकर पिंपळनेर पोलिसांच्या ताब्यात आहे. दादा खिंडकरचा मारहाण करतानाचा एक जुना व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याच्यावर आज गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मारहाण आणि घरावर हल्ला असे दोन गुन्हे त्याच्यावर दाखल करण्यात आले आहेत. दादा खिंडकरवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दादा खिंडकर हा बीडच्या बाभुळवाडी या गावाचा सरपंच असून धनंजय देशमुख यांच्या नातेवाईक आहे. दरम्यान, दादा खिंडकरचा मारहाण करतानाचा जुना व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कलम ३०७ अपहरण, कट रचणे यासह इतर कलमांचा समावेश करण्यात आला आहे. हे जुने असलेतरी त्यास हवा देत कळीचे ठरत आहेत. यातून बीड जिल्ह्यातील खरे गुंड राजकीय पुढारीच असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तीन दिवसांपूर्वी मयत संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांचा साडू खिंडकर हा मारहाण करतानाचा एक व्हिडिओ व्हायरल झाला. तसेच यापाठोपाठ एक कारवर धारदार शस्त्राने मारीत असल्याचा व्हिडिओ व्हायरल झाला. यानंतर शिवसेना (ठाकरे) जिल्हाध्यक्ष परमेश्वर सातपुते यांनी पत्रकार परिषद घेऊन खिंडकर विरोधात निशाण साधत अमरसिंह पंडित खिंडकरचे आका असल्याचे म्हटले आहे तर देशमुख कुटुंबावरही आरोप आहेत.

# हनुमंत पिंपरी, माळेगाव विद्युत उपकेंद्रांना मिळाले ५ एमव्हीएचे नवीन रोहित्र

केज । प्रतिनिधी

केज तालुक्यातील माळेगाव आणि हनुमंत पिंपरी येथील विद्युत उपकेंद्रांच्या क्षमता वाढीसाठी दोन अतिरिक्त ५ एमव्हीएचे ट्रान्सफार्मर उपलब्ध झाले आहेत. त्यासाठी केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी विशेष प्रयत्न व पाठपुरावा केला. ट्रान्सफार्मरमुळे दोन्ही उपकेंद्रांच्या आजूबाजूंच्या गावच्या शेतातील कृषी पंपांचा विजेचा गंभीर प्रश्न सुटणार असून शेतकऱ्यांना सिंचनासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. त्यामुळे नागरिक व शेतकऱ्यांमधून समाधान व्यक्त केले जात आहे.

केज तालुक्यातील माळेगाव व हनुमंत पिंपरी उपकेंद्राची क्षमता कमी पडत असल्याने सहा एजी फिडर करून दिवसाला केवळ चार तास कृषी पंपांना अडखळत वीज पुरवठा होत असल्याने शेतकरी हवालदिल झाले होते. मात्र ठरवून दिलेल्या वेळेतही काही दिवसापासून घरगुती व शेतीपंपांचा वीज पुरवठा ओव्हरलोडमुळे अचानक खंडित होत होता. त्यामुळे शेतकरी व वीज ग्राहक यांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत होता. सध्या उन्हाचा पारा वाढल्याने पिकांना पाण्याची जास्त आवश्यकता असते. अशावेळी महावितरण कडून कृषी पंपांना केवळ चार तास थ्री फेज वीजपुरवठा होत होता मात्र लाईट अभावी पिकांना पाणी देता येत नसल्यामुळे भाजीपाला, ऊस, फळबागा पिके पाण्याअभावी सुकून जाऊ लागले होते. पिकांची वाढ खुंटली होती. पुरेसा अखंडितपणे वीज पुरवठा होत नसल्याने उन्हाळ्यात पिके जगवायची कशी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला होता. विद्युत उपकेंद्राची क्षमता वाढवावी ही मागणी मागील दोन वर्षांपासून होत होती. या विजेच्या प्रश्नाला केज मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी गंभीरपणे घेत तातडीने लक्ष घालून महावितरण कंपनीच्या मुंबई येथील मुख्य कार्यालयात पाठपुरावा करून दोन ५ एमव्हीए ट्रांसफार्मर तात्काळ उपलब्ध करून दिले आहेत. या संदर्भात आ. नमिता अक्षय मुंदडा यांनी माहिती देताना सांगितले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेतून पॉवर ट्रान्सफार्मर मंजूर झाले असून, भविष्यात सौर पॅनलवरून वीज निर्मिती होईल आणि या ट्रान्सफार्मरच्या माध्यमातून शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा होणार आहे.



या नवीन ५ एमव्हीए ट्रान्सफार्मरमुळे गेल्या काही काळात वारंवार होणाऱ्या वीजपुरवठ्याच्या अडचणी दूर होणार आहेत. विशेषतः शेती पंपांसाठी आवश्यक असलेली वीज नियमित व पुरेशा दाबाने मिळणार आहे, याचा फायदा परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना होणार आहे. याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांचे आ. नमिता मुंदडा यांनी आभार मानले आहेत. दरम्यान, नवीन ट्रान्सफार्मर बसवण्यात आल्याने शेतकरी आणि ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT